व्यवस्थापन परिषदेची दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी संपन्न झालेल्या सभेचे ठराव व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल.

| बाब क्र. | बाब, ठराव आणि कार्यवाही | संबंधित विभाग |
|---|---|---|
| बाब क्र.१ | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून नविन अभ्यासक्रम/विद्याशाखा/विषय/अतिरिक्त तुकडी सुरु करण्याकरिता प्राप्त प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनास शिफारस करण्याची बाब. | संलग्नता विभाग |
| ठराव | श्री. नील हेळेकर यांनी संपूर्ण देशात उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमुळे शासनाकडे नविन अभ्यासक्रम/विद्याशाखा/विषय/ अतिरिक्त तुकडी बाबत प्रस्ताव पाठविण्याकरिता १ जुन २०२० पर्यंत मुदत वाढवून मागावी, असे सुचविले त्यावर कायदयातील तरतुदीच्या अनुशंगाने असा बदल तातडीने करणे शासन स्तरावर शक्य नसल्याने आजच्या तातडीच्या बैठकीचे आयोजन केले असल्याचे मा. कुलगुरु यांनी सांगितले.<br>तज्ज्ञ समिती व स्थानिक चौकशी समितीमध्ये नोंदणीकृत पदवीधरांचा प्रतिनिधी का नाही? याबाबत लक्षवेधीच्या माध्यमातून श्री प्रदीप सावंत यांनी विचारणा केली. संलग्नता शुल्क ज्या महाविद्यालयांकडून येणे प्रलंबित आहेत अशा महाविद्यालयांच्या प्रस्तावांची शिफारस करण्यात येऊ नये, अशी सूचना श्री दीपककुमार मुकादम यांनी केली. तद्वतच स्थानिक चौकशी समितीचा अहवाल अधिष्ठाता मंडळाने पूर्णपणे तपासला आहे त्या मध्ये मागील अहवालातील त्रुटींची पूर्तता संबंधित महाविद्यालयांनी केली आहे काय? याबाबत तपासणी होणे गरजेचे आहे असे प्राध्यापक वैभव नरवडे यांनी सुचविले.<br>या संदर्भात शासन निर्णयातील निकषांची पूर्तता करत असलेल्या महाविद्यालयांचे प्रस्ताव मान्य करावे, असे श्री निल हेळेकर यांनी सांगितले. जवळपास १५० महाविद्यालयांचे प्रस्ताव एवढया कमी कालावधीत तपासणे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना शक्य होणार नाही त्यामुळे यासंदर्भातील संपूर्ण जबाबदारी अधिष्ठाता मंडळाची आहे असे श्री दीपककुमार मुकादम यांनी निदर्शनास आणले. बृहत आराखडयाच्या संदर्भात, येणाऱ्या चार-पाच महिन्याच्या कालावधीत विशेष व्यवस्थापन सभेचे आयोजन करून यासंदर्भात सर्व माहिती व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करावी, अशी सूचना देखील श्री. दीपककुमार मुकादम यांनी केली. त्यावर यासंदर्भातील सर्व माहिती (डेटा) व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात येईल, असे माननीय कुलगुरूंनी सांगितले. मुंबईतील प्रचंड विद्यार्थी संख्या लक्षात घेता मुंबई शहर व मुंबई उपनगराच्या बाबतीत दोन महाविद्यालयांतील अंतर हा निकष लावणे उचित असणार नाही असे मत प्राध्यापक रविकांत सांगुर्डे ह्यांनी व्यक्त केले.<br>सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली व खालील ठराव करण्यात आले:-<br>१. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता नविन अभ्यासक्रम/विद्याशाखा/विषय/अतिरिक्त तुकडी सुरु करण्याकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावावर शासन निर्णय एन.जी.सी. -२०१७/(२०८/१७) म.शि.-४ दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ | |

| | | |
|---|---|---|
| | अन्वये विहित परिशिष्ट अ,ब,क, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ व १०९ नुसार कार्यवाही केल्यानंतर अधिष्ठाता मंडळाने जे प्रस्ताव पात्र ठरवले आहेत तसेच चर्चेच्या अनुशंगाने सन्माननीय सदस्यानी केलेल्या विविध सूचनांचा विचार करून (अनुकमांक १६ ससमीरा इन्स्टिटयुट ऑफ कॉमर्स ॲड सायन्स, अनुक्रमांक ३१ विकृष्ण मेनन कॉलेज ऑफ कॉमर्स, अनुक्रमांक ३२ एन.जी आचार्य ॲड डि.के. मराठे कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲड कॉमर्स, अनुकमांक ३७ एम एल डहाणूकर कॉलेज ऑफ कॉमर्स, अनुक्रमांक ३८ साठे कॉलेज, अनुक्रमांक ४० साठे कॉलेज, अनुक्रमांक ४१ नवसमाज मंडळाचे डिग्री कॉलेज) प्र-कुलगुरु व अधिष्ठाता यांनी संबंधित प्रस्तावांची पुन्हा पडताळणी करावी व जे प्रस्ताव पात्र होतील ते प्रस्ताव शासनास पाठवण्याची शिफारस करण्यात आली.<br><br>२. अनुक्रमांक ९२ अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाचे अभिनव कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲड कॉमर्स चे प्रस्ताव शासनास पाठवू नयेत.<br><br>३. जे प्रस्ताव अधिष्ठाता मंडळाने अपात्र ठरवले आहेत त्यांची शाहनिशा करण्यासाठी समिती गठीत करण्यात यावी. माननीय प्र-कुलगुरु यांना समिती गठित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले. सदर समितीने याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच पुढील शैक्षणिक वर्षाकरिता शासनास प्रस्ताव शिफारस करण्याबाबतची कार्यवाही विहित मुदतीत करण्यात यावी.<br><br>४. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षी ज्या महाविद्यालयांना अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात आली होती त्या महाविद्यालयांनी त्या अटींची पूर्तता केली आहे किंवा कसे याबाबत शहानिशा करण्यात यावी व त्याचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करण्यात यावा. | |
| संलग्नता विभागाने कार्यवाही | नविन अभ्यासक्रम/ विद्याशाखा/ विषय/ अतिरिक्त तुकडी बाबत प्रस्ताव शासनाकडे पाठविल्याचे पत्र सोबत जोडत आहे, असे संलग्नता विभागाने पत्र क्र. संलग्नता/आयसीडी/२०२०-२१/८५३ दिनांक ६ जानेवारी, २०२१ अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| बाब क्र.२ | **कोरोना विषाणुच्या (कोविड-१९) या संसर्ग रोगाच्या परिस्थितीमध्ये शैक्षणिक व परीक्षा व्यवस्थापन हाताळण्याबाबत.** | परीक्षा विभाग |
| ठराव | १. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्य सरकारने दिलेल्या निर्देशानुसार मुंबई विद्यापीठाच्या सर्व लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा तसेच संलग्नित महाविद्यालयांच्या पदवी स्तरावरील सर्व लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा १४ एप्रिलपर्यंत लांबणीवर टाकण्यात याव्यात व १४ एप्रिलनंतर राज्य सरकारच्या निर्देशानुसार व तत्कालीन परिस्थितीनुसार परीक्षेच्या आयोजना संदर्भात पुढील निर्णय घेण्यात यावा.<br>२. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळांनी परिस्थितीची अनिश्चितता लक्षात घेता परीक्षेसाठी विविध योजना (प्लॅन-अ, प्लॅन-ब, | |

| | | |
|---|---|---|
| | प्लॅन-क) तयार करावेत.<br>३. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा जरी लांबणीवर टाकल्या असतील तरी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना घरात राहून अभ्यास करण्याकरिता युटयुब व ऑनलाइन माध्यमातून अभ्यास करण्याकरिता व अभ्यासक्रमाबाबत काही समस्या असतील तर शिक्षकांशी सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्क साधावा व विद्यार्थ्यांच्या शंकेचे निराकरण करून शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहित करण्यात यावे. | |
| परीक्षा विभागाने कार्यवाही | सदर विषयासंदर्भात महाराष्ट्र शासन व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या सुचना व मार्गदर्शक तत्वे यांनुसार विद्यापीठाच्या परीक्षा घेण्यात आलेल्या आहेत, असे परीक्षा विभागाने पत्र क्र. DBOEE/ICF/2020-21/177 दिनांक २४ डिसेंबर, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| | **चर्चेच्या अनुषंगाने खालील ठराव पारित झाले :-** | |
| १. | आपत्कालीन परिस्थितीत स्वत:ची जबाबदारी व कर्तव्य अत्यंत निष्ठेने पार पाडणाऱ्या विद्यापीठातील अत्यावश्यक सेवेतील हंगामी कर्मचाऱ्यांना रुपये १०,०००/- प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा व अशा कर्मचाऱ्यांना विम्याचे संरक्षण देण्यासंदर्भात देखील सकारात्मक चर्चा झाली व त्याबाबतीत आवश्यक माहिती संकलित करण्याबाबत प्रशासनास निर्देशित करण्यात आले. | सुरक्षा विभाग |
| सुरक्षा विभागाने केलेली कार्यवाही | आपत्कालीन परिस्थितीत स्वत:ची जबाबदारी व कर्तव्य अत्यंत निष्ठेने पार पाडणाऱ्या विद्यापीठातील अत्यावश्यक सेवेतील हंगामी कर्मचाऱ्यांना रूपये १०,०००/- प्रोत्साहन भत्ता देण्यात आला. तसेच स्थायी कर्मचाऱ्यांना विम्याचे संरक्षण देण्यात आले असुन अस्थाई कर्मचाऱ्यांना विम्याचे संरक्षण देणेसंदर्भातील बाब विचाराधिन आहे, असे सुरक्षा विभागाने पत्र क्र. S.O./ICD/2020-21/184 दिनांक २३ डिसेंबर, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| २. | ज्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना गेल्या चार-पाच वर्षापासून अद्यापही निवृत्ती वेतन मिळत नाही, अशा सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना विद्यापीठ फंडातून काही राशी देता येईल का? याबाबत देखील माननीय कुलगुरूंनी व्यवस्थापन परिषदेला विनंती केली त्यावर त्यासंदर्भातील नियम व पद्धती वित्त व लेखा अधिकारी यांनी तपासून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी सूचना श्री मुकादम यांनी केली. | वित्त व लेखा विभाग |
| वित्त व लेखा विभागाने केलेली कार्यवाही | ज्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना गेल्या चार-पाच वर्षापासून अद्यापही निवृत्ती वेतन मिळत नाही, अशा सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना सध्या विद्यापीठाच्या कर्मचारी कल्याण निधी (Staff Welfare Fund) मधून निवृत्ती वेतन विषयक लाभ अंतिम मंजूरी येईपर्यंत खालील प्रमाणे तदर्थ सेवा निवृत्ती वेतन प्रदान करण्यात येते. "अ" वर्गात समावेश होणाऱ्या अधिकाऱ्यांना मासिक रु. १५,०००/- "ब" व "क" वर्गात समावेश होणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना मासिक रु. १०,०००/- "ड" वर्गात समावेश असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मासिक रु. ८,०००/- तसेच दि. ०६/११/२०२० रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन बैठकीमध्ये "अ" वर्गात समावेश होणाऱ्या अधिकाऱ्यांना मासिक रु. २२,५००/- "ब" व "क" वर्गात समावेश होणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना मासिक रु. १५,०००/- "ड" वर्गात समावेश असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मासिक रु. १२,०००/- अशी दरवाढ करण्यात यावी असा ठराव करण्यात आला आहे, असे वित्त व लेखा विभागाने पत्र क्र. वि.व ले./वि. ५/सेनिवे/८४४/२०२० दिनांक ६ जानेवारी, २०२१ अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |

| | | |
|---|---|---|
| ३. | उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थिती मध्ये आपत्कालीन व्यवस्थापन निधी (डिझास्टर मॅनेजमेंट फंड) विद्यापीठास वापरता येतो काय? असा मुद्दा श्री राजन कोळंबेकर यांनी उपस्थित केला यावर त्या संदर्भातील नियम व पद्धतीत तपासल्या जातील, असे माननीय कुलगुरूंनी सांगितले. | वित्त व लेखा विभाग |
| वित्त व लेखा विभागाने केलेली कार्यवाही | आपत्कालीन व्यवस्थापन निधीच्या व्याजाच्या रकमेतून विद्यार्थी तसेच प्राध्यापकांच्या मॉकड्रील कार्यक्रमासाठी तसेच इतर कार्यक्रमासाठी व फायर एक्सटिंग्विशर वगैरे साहित्य खरेदी करण्यासाठी सदरचा निधी वापरू शकतो. तसेच मा. कुलपती महोदयांच्या राजभवनाद्वारे आलेल्या आदेशानुसार सदरचा निधी वापरता येऊ शकतो. (नियमावली जोडत आहोत), असे वित्त व लेखा विभागाने पत्र क. वि.व.ले./गट क. ७/कार्यवाही अहवाल/८५४/२०२१ दिनांक २ मार्च, २०२१ अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| ४. | बऱ्याचश्या महाविद्यालयांमध्ये स्वयं अर्थ सहाय्यित अभ्यासक्रमांच्या (सेल्फ फायनान्स कोर्सेस) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन बऱ्याच कालावधी पासून झाले नसल्याचे प्राध्यापक वैभव नरवडे व श्री. प्रदीप सावंत यांनी निदर्शनास आणून दिले त्यावर या संदर्भात विद्यापीठातर्फे तातडीने परिपत्रक निर्गमित करण्यात येईल असे माननीय कुलगुरूंनी सांगितले. | शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (म.शि.) |
| शिक्षक नियुक्ती व मान्यता(म.शि.) विभागाने केलेली कार्यवाही | मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना विद्यापीठ परिपत्रक क. टीएएएस (युटी/सीटी)/०४/२०२०-२०२१ दिनांक १५ सप्टेंबर, २०२० अन्वये विनाअनुदानित स्वयंअर्थसहायित कोर्सेस (Self Financed Courses) शिकवणाऱ्या शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन तात्काळ प्रथम प्राधान्याने अदा करण्यात यावे असे कळविण्यात आले आहे. (प्रत संलग्न), असे शिक्षक नियुक्ती व मान्यता (म.शि.) या विभागाने पत्र क. टीएएएस (सीटी आयसीडी / २०-२१ /१५६ दिनांक १५ सप्टेंबर, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |

डॉ. बळीराम गायकवाड
कुलसचिव (प्र.)
(मुंबई विद्यापीठ)

मुंबई - ४०० ०३२
१७ एप्रिल, २०२१